-:प्रेसनोट:-

## चंद्रपूर शहर महानगरपालिका येथिल स्थापत्य अभियंता श्री. शुभम नंदकिशोर वरघट यांचे सह खाजगी इसम दिनेश दिलीप समद्दर यांचेविरुध्द ॲन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूरची कारवाई

चंद्रपूर शहर महानगरपालीका येथिल श्री. शुभम नंदकिशोर वरघट,वय ३० वर्ष, पद स्थापत्य अभियंता, पंतप्रधान आवास योजना, अतिरिक्त कार्यभार अतिक्रमण विभाग, यांनी खाजगी इसम श्री. दिनेश दिलीप समद्दर, वय ३७ वर्ष, यांचे मार्फतीने १ लाख ३० हजार रूपये लाच मागणी करून स्विकारल्याने ॲन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर यांचे पथकाने आज दिनांक २१/०२/२०२६ रोजी कार्यवाही केली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार हे चंद्रपूर येथील रहिवासी असून तक्रारदाराचे भंगाराम वार्ड चंद्रपूर येथे भंगार (स्क्रब) चे दुकान आहे. त्यांनी सन २०२० मध्ये ईराई नदीकाठावरील १२०० स्के. फुटाचे बांधकाम असलेले घर खरेदी केले होते. जे नंतर तोडून वॉल कंपाऊड आणी टिनाचे शेड टाकून भंगार साठविण्यासाठी वापरत होता.

सदर जागेच्या मागील बाजुस असलेल्या प्लॉट धारकाने रस्त्यासाठी अडचण येत असल्याने महानगरपालीकेकडे तक्रार केली होती. त्यावरून तक्रारदाराला महानगरपालीकेकडून नोटीस मिळाली होती. त्यासंबधाने दिनांक १४/०२/२०२६ रोजी तक्रारदाराने अभियंता श्री.शुभम वरघट, स्थापत्य अभियंता, पंतप्रधान आवास योजना, अतिरिक्त कार्यभार अतिक्रमण विभाग,चंद्रपूर शहर महानगरपालीका आणी खाजगी इसम श्री. दिनेश समद्दर यांची भेट घेतली असता, श्री.वरघट यांनी बांधकाम अनाधिकृत असल्याचे सांगुन ते न तोडण्यासाठी ३ लाख रूपयांची लाच मागीतली होती. त्यांच्यात तडजोडी अंती २ लाख ३० हजार रूपये देण्याचे ठरले, त्यामुळे तक्रारदाराने घाबरून दिनांक १७/०२/२०२६ रोजी १ लाख रूपये श्री.वरघट यांच्या सांगण्यावरून खाजगी इसम श्री. दिनेश समद्दर यांचेकडे दिले. उर्वरित १ लाख ३० हजार रूपये श्री.शुभम वरघट व श्री.दिनेश समददर यांना लाच देण्याची तक्रारदाराची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २०/०२/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन तक्रार दिली.

तक्रारदार यांचे प्राप्त तक्रारीवरून दि. २०/०२/२०२६ रोजी आरोपी क्र. १ श्री. शुभम नंदकिशोर वरघट,वय ३० वर्ष, पद स्थापत्य अभियंता, पंतप्रधान आवास योजना, अतिरिक्त कार्यभार अतिक्रमण विभाग,चंद्रपूर शहर महानगरपालीका २) खाजगी इसम श्री. दिनेश दिलीप समद्दर, वय ३७ वर्ष, यांची पंचासमक्ष पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदाराचे भंगाराचे दुकानाचे बांधकाम न तोडण्यासाठी उर्वरित १ लाख ३० हजार रूपये लाच रक्कमेची मागणी करून दिनांक २१/०२/२०२६ रोजी खाजगी इसम दिनेश समद्दर याचेकडे लाच रक्कम १ लाख ३० हजार रूपये देण्याचे श्री.वरघट यांनी तक्रारदाराला सांगितले.

त्यावरून आज दि. २१/०२/२०२६ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र. १ श्री. शुभम नंदकिशोर वरघट,वय ३० वर्ष, पद स्थापत्य अभियंता, पंतप्रधान आवास योजना, अतिरिक्त कार्यभार अतिक्रमण विभाग,चंद्रपूर शहर महानगरपालीका यांचेकरिता खाजगी इसम आरोपी क्र. २ श्री. दिनेश दिलीप समद्दर, वय ३७ वर्ष, यांनी १ लाख ३० हजार रूपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले. आरोपी क्र. १ श्री. शुभम नंदकिशोर वरघट,वय ३० वर्ष, पद स्थापत्य अभियंता, पंतप्रधान आवास योजना, अतिरिक्त कार्यभार अतिक्रमण विभाग,चंद्रपूर शहर महानगरपालीका यांनी आपल्या पदाचा व अधिकाराचा अप्रामाणीकपणे वापर करून खाजगी इसम आरोपी क्र. २ श्री. दिनेश दिलीप समद्दर, यांचे मार्फतीने एकुण १ लाख ३० हजार रूपयाची लाच मागणी करून स्विकारली आहे. तरी दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपासकार्य सुरू आहे.

सदरची कार्यवाही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर, श्रीमती माधुरी बावीस्कर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर, पोलीस उपअधीक्षक, श्रीमती मंजुषा भोसले यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सचिन धर्मेजवार यांनी व सापळा पथक पोशि अमोल सिडाम, राकेश जांभुळकर, रार्जेद्र चौधरी, पोहवा. रविकांत इंगळे, विर्जेद्र वाढई, प्रदिप ताडाम, म.पो.शि. मेघा मोहुर्ले , चापोशि/सतिश सिडाम , संदिप कवरासे सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे. हॅश व्हॅल्यु घेण्यात आलेली आहे.

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एर्जेट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीतअसल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा.

- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय नागपूर दुरध्वनी क्रमांक** :- ०७१२-२५६१५२०
  डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर
  श्रीमती माधुरी बावीस्कर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर
  श्री.विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर
- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक** :- ०७१७२-२५०२५१, ८३७९९५१०६४
  टोल फ्रि क्रमांक :- १०६४
  श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ९३२२२५३३७२
  श्री. निलेश उरकुडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ८४५९८४८५५६
  श्री. सचिन धर्मेजवार, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ९६२३०५५६५५

**Email: acbchandrapur@gmail.com Website: www.acbmaharashtra.gov.in**

(सचिन धर्मेजवार)
पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर

2026/2/22 00:23

Scanned with OKEN Scanner